# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 28/02/2023 (मंगळवार) सकाळ


## चोरी

**१) पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील गहुहिवरा रोड संजीवनी नगर वार्ड क्र. ६ कांद्री कन्हान येथे दिनांक २६/०२/२०२३ चे २२.०० वा. ते दिनांक २७/०२/२०२३ चे ०७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— धर्मराज अखाडू वंजारी, वय ३० वर्ष, रा. गहूहिवरा रोड संजीवनी नगर वार्ड नं ०६ कान्द्री कन्हान यांनी शेतीचे कामाकरीता घराजवळ रोडलगत आंगणात ठेवलेला महिन्द्रा 475 DI ट्रॅक्टर क्रमांक MH-40 L-2509 स्कॉयटेक कंपनीची बॅटरी फुजन 90 AL किमंती अंदाजे 5000/— रूपयाचा मुद्देमाल दि. 26/02/2023 चे सकाळी 10.00 वा. कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा खुशाल रामटेके ब नं २९८ मो. क्र. ८४८५८६१४४२ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत १.५ कि.मी. अंतरावरील काटोल बसस्टॉप येथे दि २७/२/२०२३ रोजी १४.०० वा. ते १४.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. बबली गणेश मोरोलिया, वय ३० वर्ष, रा. कारला ता. काटोल ही सावनेर येथे जाण्याकरिता बसमध्ये बसली व घुबडमेट येथे पोहचल्यावर टिकीट काढण्याकरीता फिर्यादी हिचेकडे असलेली हॅन्ड बॅग पाहिली असता, हॅन्ड बॅगची चैन उघडी दिसली. व त्यामध्ये असलेले सोन्याचे दागिने व नगदी पैसे असलेली पर्स दिसून आली नाही. सिटच्या आजुबाजुला पाहिले असता पर्स मिळून आली नाही. त्यामध्ये असलेले नगदी १००००/— रूपये व जुनी वापरती सोन्याची पदक व सोन्याचे गहू मनी असलेली पोत वजनी २ तोळे किंमती ८००००/— रूपये, जुने वापरते सोन्याचे कानातले दोन टॉप्स वजनी ७ ग्रॅम किंमती अंदाजे २८,०००/— रूपये असा एकुण ११८०००/— रूपयाचा मुद्देमाल फिर्यादी ही काटोल बसस्टॉप येथून बसमध्ये चढतांना कोणीतरी अज्ञात ईसमाने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अशोक देशमुख पोस्टे काटोल मो. नं ९६६५६१५२९५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर